


# के. के. वाघ व्याख्यानमालेत रागिणी कामतीकर यांची मैफल

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे आयोजित बाळासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमालेचे २२ वे पुष्प महाकवी कालिदास कलामंदिरात मोठ्या उत्साहात झाले. प्रसिद्ध गायिका रागिणी कामतीकर यांनी 'मेरी आवाज ही पहचान है' या सांगीतिक मैफलीतून भारतरत्न लता मंगेशकर यांच्या सुरेल आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जयप्रकाश जातेगांवकर यांनी भूषविले. रागिणी कामतीकर यांनी लतादीदींच्या कारकिर्दीतील विविध पैलू उलगडत हिंदी व मराठीतील लोकप्रिय गीते सादर केली. गाण्यांच्या सादरीकरणासोबत गीतांमागचे भावविश्व आणि दीदींची संगीत क्षेत्रातील तपस्या यावर केलेले भाष्य रसिकांच्या मनाला भिडले. या व्याख्यानमालेचे हे २२ वे पुष्प आहे. दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम देण्याची संस्थेची परंपरा यंदाही नाशिककरांनी अनुभवली. नाशिकच्या रसिकांनी या सुरांच्या मैफलीस प्रचंड गर्दी करत भरभरून दाद दिली. यावेळी विद्यापीठात सुवर्णपदक पटकावल्याबद्दल अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती अटल हिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, शकुंतला वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर व सचिव प्रा. के. एस. बंदी उपस्थित होते. डॉ. सुनील कुटे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

**दै . गावकरी दि. ११ फेब्रुवारी २०२६**